अण्णासाहेब गुंजकर रंगमंचावरुन बालकलाकारांसमवेत 'झगमग तारे' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर 'वैऱ्यांची रात्र', 'मादी', 'काही खरं नव्हे', 'दर्द ना जाने कौन' इत्यादि तेंडुलकरांच्या एकांकिका सादर करण्यात आल्या.

'माय डिअर शुभी', 'शेजारी', 'फिफ्टी फिफ्टी' हे दिर्घांक सादर करण्यात आले. त्यानंतर 'आई पण बाबा पण', 'खेळ मांडियेला', 'क्राईम पॅशनेल' ही प्रायोगिक नाटके कुसुम नाट्यगृहात सादर करण्यात आली.

कृष्णराव फुलांब्रीकर मुक्त मंचावरुन 'जायंटस् ग्रुप, सेलू', 'तन्मय ग्रुप', 'नाट्य परिषद नांदेड शाखा', 'सन्मित्र साहित्य मंडळ, लातूर', 'नाट्य शास्त्र विभाग, बीड' यांनी पथनाट्ये सादर केली.

## जादू तेरी नजर.........

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या समारोपाच्या रात्री सुयोग निर्मित 'जादू तेरी नजर !' नाटक सादर करण्यात आले. त्याला नांदेडमधील अनेक नाट्य रसिक उपस्थित होते. रसिकांनी नाटकाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

## खुले अधिवेशन आणि समारोप समारंभ

रसिकांची प्रचंड गर्दी, उत्साहाला आलेले उधाण, कलाकारांची लक्षणीय उपस्थिती, विविध कार्यक्रमांची रेलचेल अशा पार्श्वभूमीवर नाट्य संमेलनाचा समारोप समारंभ सुरु झाला. तेव्हा सर्वांच्याच भावना हेलावल्या होत्या. निरोप घेण्याच्या कल्पनेनेच मने व्याकुळ झालेली होती. डोळ्यांच्या कडाही पाणवल्या होत्या. संमेलनाच्या समारोपासाठी मान्यवर व्यासपीठावर आले तेव्हा या सर्व भावभावनांचे प्रतिबिंब समोरच्या रसिकवृदांत दिसत होते.

समारोपासाठी उपस्थित असलेले मान्यवर, महसूल मंत्री, मा.श्री. नारायण राणे, अर्थमंत्री मा. श्री. जयंत पाटील, सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री मा. श्री. राणा जगजीतसिंह पाटील, चित्रपट निर्माता मा. श्री. सुभाष घई, अभिनेता मा. श्री. सुनिल शेट्टी, श्री. महेश मांजरेकर, महाराष्ट्र टाइम्सचे संपादक मा. श्री. भारतकुमार राऊत यांची भाषणे झाली. मा. श्री. नारायण राणे, मा.श्री. जयंत पाटील, श्री. राणा जगजीतसिंह पाटील या मंत्री महोदयांनी नाट्यचळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी नांदेड येथील रसिकांच्या प्रतिसादामुळे आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे नाट्य संमेलन यशस्वी झाल्याचे सांगितले व सर्व मान्यवरांचे, कलाकारांचे व रसिकांचे आभार मानले.
संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत म्हणाले, नाट्य संमेलनाला रसिकांनी दिलेला उदंड प्रतिसाद आणि कलाकारांची लक्षणीय उपस्थिती यामुळे हे नाट्यसंमेलन अविस्मरणीय झाले आहे. त्यांनी नाट्यसंमेलनासाठी काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले व कृतज्ञता व्यक्त केली.

या संमेलनात प्रतिवर्षीप्रमाणे खुले अधिवेशन संपन्न झाले. मराठी रंगकर्मींसाठी महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर भूखंड उपलब्ध करुन द्यावा. शासनातर्फे कलाकारांना देण्यात येणारे मानधन वाढवावे अशा ठरावासह आठ ठराव या अधिवेशनात मंजूर करण्यात आले.